# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- *jtdirrom@gmail.com* *website – www.jdteromumbai.com*


परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/ 1173

दिनांक : 28 MAR 2018

प्रति,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : ईबीसी २०१७-१८ च्या ऑनलाईन आधार तपशिलात दुरुस्ती करण्याबाबत
खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती तसेच वसतीगृह निर्वाहभत्ता योजनेबाबत

**१. "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना"**

**२. "डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना"**

सर्व शासकीय (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर (http://www.dtemaharashtra.gov.in) विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जांच्या छाननीची कार्यवाही पूर्ण करुन घेण्यांत आलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जाबरोबर विहीत कागदपत्रे सादर करण्यांत आली होती असे अर्ज ऑनलाईन मंजूर करण्यांत आले आहेत. ज्या अर्जांसोबत विहीत कागदपत्रे जोडलेली नाहीत असे अर्ज नामंजूर करण्यांत आले आहेत.

ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन मंजूर करण्यांत आले आहेत. अशा विद्यार्थ्यांच्या आधार तपशिलाच्या अधिप्रमाणनाची (Online Adhaar Authentication) कार्यवाही डीटीई स्तरावर पूर्ण करण्यांत आलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या आधार तपशिलात तफावत आढळलेली आहे. अशा विद्यार्थ्यांच्या बाबत संकेतस्थळावरील संस्थांच्या लॉगिनमध्ये संबंधीत विद्यार्थ्यांची यादी प्रसारीत करण्यांत आलेली आहे. त्यानुसार सर्व संबंधीत संस्थांनी त्यांना कळविण्यांत आलेल्या यादीतील विद्यार्थ्यांचा तपशिल विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड वरील तपशिलाशी अचूक तपासून त्याबाबतची माहिती Edit Adhaar Details ह्या Option मध्ये जाऊन दुरुस्त (Edit) करायची आहे. सदर माहिती दुरुस्त करुन झाल्यानंतर त्याबाबतचा तपशिल ईबीसी पोर्टलवरील मेसेज बॉक्सद्वारे पाठवायचा आहे.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता